<u>नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका स्थायी समिती नांदेड.</u>

दिनांक 07.09.2018 दुपारी 04.00 वाजता नांवामनपा स्थायी समितीची सभा मनपाकेच्या मुख्य कार्यालयाचे प्रशाकिय इमारतीतील पहिल्या माळयावरील समिती सभागृहात मध्ये भरविण्यात आली होती. उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील म.न.पा. स्थायी समितीचे सदस्य उपस्थित होते.

**श्री अब्दुल शमीम अब्दुल्ला साब, सभापती**

**<u>सर्वश्री</u>**

| | |
|---|---|
| अ. सत्तार अ. गफुर | चव्हाण आनंद शंकरराव |
| पवळे उमेश देवराव | खान म. मसुद अहेमद खान उस्मान खान |
| खान फारुख अली इलीयात खान | स. शेर अली अ. महेबुब अली |
| तिडके प्रशांत विठ्ठल | अ. लतीफ अ. मजीद |
| रावत भानुसिंह गयादिनसिंह | मुथा कांताबाई प्रकाशचंद |
| नवाब गुरमितसिंघ ब-यामसिंघ | गोडबोले ज्योत्सना राजु |

**सभापती** उपस्थित सर्व स्थायी समितीचे स. सदस्य, आयुक्त मा. श्री लहुराज माळी, सौ. गिता ठाकरे उपआयुक्त प्रशासन, श्री विलास भोसीकर उपआयुक्त, श्री प्र. मा. येवले उपआयुक्त, श्री संतोष कंदेवार मुख्यलेखाधिकारी, कार्यकारी अभियंता श्री गिरीष कदम, कार्यकारी अभियंता श्री सुग्रीव अंधारे, शहर अभियंता बाशेट्टी व सर्व विभाग प्रमुख, क्षेत्रिय अधिकारी यांचे स्वागत करुन सभेचे कामकाजास सुरुवात करण्यात येते.

**स. शेर अली** वैद्यकिय आरोग्य अधिकारी या पदावर डॉ. बिसेन हे सेवाजेष्ठ आहेत त्यांना या पदाचा पदभार देण्यात यावा. त्यांच्यापेक्षा कनिष्ठ अधिका-यास पदाचा पदभार दिलेला आहे. आमची विनंती आहे की, डॉ. बिसेन यांना वैदयकीय आरोग्य अधिकारी या पदाचा पदभार सोपविण्यात यावा. डॉ.बिसेन हे काम करतात त्यांना चार्ज दिला पाहीजे.

**अब्दुल सत्तार** डॉ. बिसेन यांना वैदयकीय आरोग्य अधिकारी या पदाचा पदभार सोपविण्यात यावा. डॉ.बिसेन हे काम करतात त्यामुळे चार्ज देण्यात यावा. इतर अधिकारी यांचे कडे चार्ज देण्यात आलेला आहे अशा वेळी त्यांनी महापालिकेचे उत्पन्नात वाढ करुन दयावी.

**स. शेर अली** यापुर्वी ज्या अधिका-यांनी काम केले त्यांची यादी माझ्याकडे आहे त्यामुळे डॉ. बिसेन यांना वैदयकीय आरोग्य अधिकारी पदाचा पदभार देण्यात यावा.

**पवळे उमेश** माझा व स. शेर अली आमचा दोघांचा एक आयेत्या वेळीचा प्रस्ताव खालील प्रमाणे सादर करीत आहे त्यास मान्यता देण्यात यावी तो नगरसचिवाने वाचवुन दाखवावे.

**नगरसचिव** **श्री पवळे उमेश व स. शेर अली यांचा प्रस्ताव पुढील प्रमाणे आहे:-** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड मध्ये कार्यरत असलेले सहाय्यक वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. श्री सुरेशसिंह बिसेन यांनी पुढील प्रमाणे आरोग्य विषयक सेवा दिली आहे. कार्यालयीन पत्र क्रं. नावाशमनपा/आस्ववि/ 16059/2004 दिनांक 09.02.2004 अन्वये मा. आयुक्त यांच्या आदेशाने त्यांनी सहाय्यक वैद्यकिय आरोग्य अधिकारी म्हणून पदभार देण्यात आलेला आहे तसेच महानगरपालिका सर्वसाधारण सभा दिनांक 17.10.2006 रोजी ठराव क्रं. 95 अन्वये सहाय्यक वैद्यकिय आरोग्य अधिकारी या पदासाठी मान्यता प्रदान केली आहे त्याअनुषंगाने मागील 14 वर्षा पासुन सतत आरोग्य विषयक कामे विहीत वेळेत केली आहे तसेच भारत सरकारच्या प्रजनन व बाल आरोग्य अप्पा क्रं. 02 चा सदस्य सचिव म्हणून 2005 ते 2010 या 05 वर्षाच्या कालावधीत काम केले आहे. या कालावधीत सदरील कार्यक्रम यशस्वी पार पाडलेली आहे. तसेच महाराष्ट्र शासनाचे प्रजनन व बालआरोग्य टप्पा क्रं. 02 मध्ये आरसीएच ऑफिसर म्हणून 2005 ते आज पर्यंत असे एकूण 13 वर्ष नांदेड शहरातील लसीकरणाचे काम यशस्वीपणे राबविण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनाचा क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमातंर्गत सदस्य सचिव तथा शहर क्षयरोग अधिकारी म्हणून 2003 पासून कार्यरत असून सतत 15 वर्ष शहरामध्ये क्षयरोगावर यशस्वीपणे नियंत्रण ठेवले आहे. तसेच भारत सरकारचे राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत अतिरिक्त सचिव या पदावर 2012 पासून कार्यरत आहे.

डॉ सुमती ठाकरे हे दिनांक 31.08.18 रोजी सेवानिव अनु.क्रं. 2 व 3 डॉ. शोभा तोष्णीवाल व डॉ. अशोक धबाले यांनी प्र. वैद्यकिय आरोग्य अधिकारी या पदावर काम करु शकत नाही असे लिहून दिले आहे त्यामुळे सेवा जेष्ठतेनुसार डॉ. सुरेशसिंह बिसेन हे प्रथम क्रमांकावर येत असून

त्यांनी प्र. वैद्यकिय आरोग्य अधिकारी या पदावर त्वरीत नियुक्ती देण्यात यावी करिता प्रस्ताव स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर.

**स. शेर अली** **वरील प्रस्तावात दुरुस्ती असुन जे पुढील प्रमाणे आहे त्या दुरुस्तीसह मान्यता देण्यात यावी.**

डॉ. सुमती ठाकरे हे दिनांक 31.08.2018 रोजी नियतमयोमानानुसार सेवा निवृत्त झाल्या असुन वैद्यकिय अधिकारी कार्यालयीन अधिसुचना क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-1/6566/18 दिनांक 08.08.2018 च्या आस्थापनेवर कार्यरत अधिकारी कर्मचारी यांची सालसन 31 डिसेंबर 2017 अखेरची प्रारुपत सेवा जेष्ठता यादी प्रसिध्द करण्यता आलेली असुन सदरील सेवा जेष्ठता यादीतील अनुक्रमांक 02 वरील डॉ. शोभा जोष्णीवाल अनुक्रमांक 03 वरील श्री डॉ. अशोक धबाले हे वैद्यकिय अधिकारी असुन सदरच्या दोन्ही अधिका-यांनी त्यांना वैद्यकिय आरोग्य अधिकारी पदाचा अतिरिक्त स्वरुपाचा पदभर सोपविण्यात येवु नये म्हणुन लेखी पत्राव्दारे कळविलेले आहेत. त्यामुळे सदरील जेष्ठता यादीतील अनुक्रमांक 03 वर श्री डॉ. सुरेशसिंह बिसेन हे कार्यरत आहेत प्रशासना संबंधीतांची सेवाजेष्ठता डावलुन डॉ. सविता यशवंतराव चव्हाण यांना प्रभारी वैद्यकिय आरोग्य अधिकारी म्हणुन अतिरिक्त स्वरुपाचा काम पाहण्या बाबतचे आदेश निर्गमीत केलेले आहे त्यामुळे डॉ. सुरेशसिंह बिसेन यांच्यावर अन्याय झाल्याचे सिध्द होते.

वास्तविक पहाता मनपा कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-6/1779/15 दिनांक 11.05.2015 अन्वये डॉ. श्री मो. आसीफ बिएएमएस, वैद्यकिय अधिकारी यांना प्र. वैद्यकिय आरोग्य अधिकारी या पदाचा अतिरिक्त स्वरुपात काम पाहण्याचे आदेश देण्यात आली होते. तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद हिंगोली यांचे पत्र क्रं. जिपहि/आरोग्य/ आस्था-1/कावि/164/2013 दिनांक 04.02.2013 अन्वये डॉ. रुनवाल एसआर., बिएएमएस यांना जिल्हा आरोग्य अधिकारी म्हणुन तसेच डॉ. उत्तमराव भाऊराव मुंढे बिएएमएस यांना पण जिल्हा आरोगय अधिकारी, अधिष्ठाता डॉ. शंकरराव चव्हाण शासकिय वैद्यकीय महाविद्यालय यांचे पत्र क्रं. डॉचशावैमना/उश्रेलले/250/2010 दिनांक 20.07.2010 अन्वये श्री डॉ. उत्तम एम. इंगळे बिएएमएस यांना प्रभारी उप वैद्यकीय अधिक्षक तथा निवासी वैद्यकिय अधिकारी म्हणुन पदभार सोपविण्यात आले होते.

करिता डॉ. सविता यशवंतराव चव्हाण यांना अतिरिक्त स्वरुपात प्रभारी वैद्यकिय आरोग्य अधिकारी निर्गमीत करण्यात आलेले आदेश रद्द करण्यास मान्यता देण्यात येते. तसेच वरील सर्व बाबींचा विचार करता महाराष्ट्र शासनाचे अधिष्ठाता डॉ. शंकरराव चव्हाण शासकिय वैद्यकीय महाविद्यालय, व जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद हिंगोली, तसेच महानगरपालिकेतील हया तिन्हा बिएएमएस अधिकारी यांना विविध कार्यालयात जिल्हा आरोग्य अधिकारी व उप वैद्यकीय अधिक्षक तथा निवासी वैद्यकीय अधिकारी, प्र. वैद्यकिय आरोग्य अधिकारी म्हणुन असे अतिरिक्त स्वरुपाचा पदभार दिल्यामुळे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील सेवाजेष्ठता यादीतील अनुक्रमांक 03 वर कार्यरत असलेले वैद्यकिय अधिकारी श्री डॉ. सुरेशसिंह बिसेन यांना या महापालिकेत वैद्यकिय व प्रशासकिय स्वरुपाचा भरपुर अनुभव असल्यामुळे संबंधीतास प्र. वैद्यकिय आरोग्य अधिकारी म्हणुन अतिरिक्त स्वरुपाचा पदभार सोपविण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सभापती** श्री उमेश पवळे व स. शेर अली यांनी जो प्रस्ताव मांडला व दुरुस्ती प्रस्तावासह डॉ. अजयसिंह बिसेन हे सेवा जेष्ठतेनुसार जेष्ठ असल्यामुळे त्यांना वैदयकीय आरोग्य अधिकारी या पदाचा पदभार देण्या बाबतचा प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यता येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं. 60** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड मध्ये कार्यरत असलेले सहाय्यक वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. श्री सुरेशसिंह बिसेन यांनी पुढील प्रमाणे आरोग्य विषयक सेवा दिली आहे. कार्यालयीन पत्र क्रं. नावाशमनपा/आस्वधि/ 16059/2004 दिनांक 09.02.2004 अन्वये मा. आयुक्त यांच्या आदेशाने त्यांनी सहाय्यक वैद्यकिय आरोग्य अधिकारी म्हणून पदभार देण्यात आलेला आहे तसेच महानगरपालिका सर्वसाधारण सभा दिनांक 17.10.2006 रोजी ठराव क्रं. 95 अन्वये सहाय्यक वैद्यकिय आरोग्य अधिकारी या पदासाठी मान्यता प्रदान केली आहे त्याअनुषंगाने मागील 14 वर्षा पासुन सतत आरोग्य विषयक कामे विहीत वेळेत केली आहे तसेच भारत सरकारच्या प्रजनन व बाल आरोग्य अप्पा क्रं. 02 चा सदस्य सचिव म्हणून 2005 ते 2010 या 05 वर्षाच्या कालावधीत काम केले आहे. या कालावधीत सदरील कार्यक्रम यशस्वी पार पाडलेली आहे. तसेच महाराष्ट्र

शासनाचे प्रजनन व बालआरोग्य टप्पा क्रं. 02 मध्ये आरसीएच ऑफिसर म्हणून 2005 ते आज पर्यंत असे एकूण 13 वर्ष नांदेड शहरातील लसीकरणाचे काम यशस्वीपणे राबविण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनाचा क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमातंर्गत सदस्य सचिव तथा शहर क्षयरोग अधिकारी म्हणून 2003 पासून कार्यरत असून सतत 15 वर्ष शहरामध्ये क्षयरोगावर यशस्वीपणे नियंत्रण ठेवले आहे. तसेच भारत सरकारचे राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत अतिरिक्त सचिव या पदावर 2012 पासून कार्यरत आहे.

डॉ. सुमती ठाकरे हे दिनांक 31.08.2018 रोजी नियतमयोमानानुसार सेवा निवृत्त झाल्या असुन वैद्यकिय अधिकारी कार्यालयीन अधिसुचना क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-1/6566/18 दिनांक 08.08.2018 च्या आस्थापनेवर कार्यरत अधिकारी कर्मचारी यांची सालसन 31 डिसेंबर 2017 अखेरची प्रारुपत सेवा जेष्ठता यादी प्रसिध्द करण्यता आलेली असुन सदरील सेवा जेष्ठता यादीतील अनुक्रमांक 02 वरील डॉ. शोभा जोष्णीवाल अनुक्रमांक 03 वरील श्री डॉ. अशोक धबाले हे वैद्यकिय अधिकारी असुन सदरच्या दोन्ही अधिका-यांनी त्यांना वैद्यकिय आरोग्य अधिकारी पदाचा अतिरिक्त स्वरुपाचा पदभार सोपविण्यात येवु नये म्हणुन लेखी पत्राव्दारे कळविलेले आहेत. त्यामुळे सदरील जेष्ठता यादीतील अनुक्रमांक 03 वर श्री डॉ. सुरेशसिंह बिसेन हे कार्यरत आहेत प्रशासना संबंधीतांची सेवाजेष्ठता डावलुन डॉ. सविता यशवंतराव चव्हाण यांना प्रभारी वैद्यकिय आरोग्य अधिकारी म्हणुन अतिरिक्त स्वरुपाचा काम पाहण्या बाबतचे आदेश निर्गमीत केलेले आहे त्यामुळे डॉ. सुरेशसिंह बिसेन यांच्यावर अन्याय झाल्याचे सिध्द होते.

वास्तविक पहाता मनपा कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-6/1779/15 दिनांक 11.05.2015 अन्वये डॉ. श्री मो. आसीफ बिएएमएस, वैद्यकिय अधिकारी यांना प्र. वैद्यकिय आरोग्य अधिकारी या पदाचा अतिरिक्त स्वरुपात काम पाहण्याचे आदेश देण्यात आली होते. तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद हिंगोली यांचे पत्र क्रं. जिपहि/आरोग्य/आस्था-1/कावि/164/2013 दिनांक 04.02.2013 अन्वये डॉ. रुनवाल एसआर., बिएएमएस यांना जिल्हा आरोग्य अधिकारी म्हणुन तसेच डॉ. उत्तमराव भाऊराव मुंढे बिएएमएस यांना पण जिल्हा आरोगय अधिकारी, अधिष्ठाता डॉ. शंकरराव चव्हाण शासकिय वैद्यकीय महाविद्यालय यांचे पत्र क्रं. डॉचशावैमना/उश्रेलले/250/2010 दिनांक 20.07.2010 अन्वये श्री डॉ. उत्तम एम. इंगळे बिएएमएस यांना प्रभारी उप वैद्यकीय अधिक्षक तथा निवासी वैद्यकिय अधिकारी म्हणुन पदभार सोपविण्यात आले होते.

करिता डॉ. सविता यशवंतराव चव्हाण यांना अतिरिक्त स्वरुपात प्रभारी वैद्यकिय आरोग्य अधिकारी निर्गमीत करण्यात आलेले आदेश रद्द करण्यास मान्यता देण्यात येते. तसेच वरील सर्व बाबींचा विचार करता महाराष्ट्र शासनाचे अधिष्ठाता डॉ. शंकरराव चव्हाण शासकिय वैद्यकीय महाविद्यालय, व जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद हिंगोली, तसेच महानगरपालिकेतील हया तिन्हा बिएएमएस अधिकारी यांना विविध कार्यालयात जिल्हा आरोग्य अधिकारी व उप वैद्यकीय अधिक्षक तथा निवासी वैद्यकीय अधिकारी, प्र. वैद्यकिय आरोग्य अधिकारी म्हणुन असे अतिरिक्त स्वरुपाचा पदभार दिल्यामुळे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील सेवाजेष्ठता यादीतील अनुक्रमांक 03 वर कार्यरत असलेले वैद्यकिय अधिकारी श्री डॉ. सुरेशसिंह बिसेन यांना या महापालिकेत वैद्यकिय व प्रशासकिय स्वरुपाचा भरपुर अनुभव असल्यामुळे संबंधीतास प्र. वैद्यकिय आरोग्य अधिकारी म्हणुन अतिरिक्त स्वरुपाचा पदभार सोपविण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**स. शेर अली** शहरात रिलांयन्सला परवानगी देण्यात आलेली आहे त्याचे काम शहरात चालू आहे. ते काम का थांबवण्यात आले नाही.

**सभापती** शहरात ब-याच ठिकाणी रस्ते खोदुन पाईप लाईन टाकण्याचे काम चालू आहे. लाईन टाकण्यासाठी सभागृहाची मान्यता आवश्यक आहे ती मान्यता घेण्यात आलेली नाही ते का घेण्यात आलेली नाही. याचा खुलासा प्रशासनाने करावा.

**कार्यकारी अभियंता (सांबावि)** शासन निर्णयानुसार सभागृहाची मान्यता घेण्याबाबत उल्लेख दिसुन येत नाही.

**अ. सत्तार** सर्व साधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. सर्व तपासणी करण्याकरीता एक समिती स्थापन करण्यात यावी.

**भानुसिंग रावत** कोणता शासन निर्णय आहे हे दाखविण्यात यावा.

**स. शेर अली** परभणीच्या कामाचा अभ्यास दौरा काढण्यात येईल. म्हणुन समितीचा प्रथम समिती गठीत करण्यात यावी.

**सभापती** रिलायन्स कंपनी मार्फत शहरातील रस्ते खोदवुन केबल टाकण्याचे काम चालु आहे सदर कंपनीला काम कोणाच्या मान्यतेने देण्यात आले काम देण्यापुर्वी महासभेची अथवा स्थायी समितीची मंजुर घेतली आहे काय या बाबत एक चौकशी समिती गठीत करण्यात येत असुन सदरील चौकशी समितीत सभापती स्थायी समिती यांच्या अध्यक्षते खाली श्री स. शेर अली, अ. सत्तार अ. गफुर, भानुसिंह रावत, आनंद चव्हाण, कार्यकारी अभियंता साबांवि, उपआयुक्त विकास याची समिती गठीत

करण्यात येत असुन सदरील समितीने संपुर्ण कामकाजा संबंधीत कागदपत्रे व संचिकेची पडताळणी करुन चौकशी अहवाल पुढील स्थायी समिती समोर सादर करुन त्यावर निर्णय घेण्यास मान्यता देण्यात येते

**ठराव क्रं. 61** **ठराव**

रिलायन्स कंपनी मार्फत शहरातील रस्ते खोदवुन केबल टाकण्याचे काम चालु आहे सदर कंपनीला काम कोणाच्या मान्यतेने देण्यात आले काम देण्यापुर्वी महासभेची अथवा स्थायी समितीची मंजुर घेतली आहे काय या बाबत एक चौकशी समिती गठीत करण्यात येत असुन सदरील चौकशी समितीत सभापती स्थायी समिती यांच्या अध्यक्षते खाली श्री स. शेर अली, भानुसिंह रावत, आनंद चव्हाण, कार्यकारी अभियंता साबांवि, उपआयुक्त विकास, विधी अधिकारी याची समिती गठीत करण्यात येत असुन सदरील समितीने संपुर्ण कामकाजा संबंधीत कागदपत्रे व संचिकेची पडताळणी करुन चौकशी अहवाल पुढील स्थायी समिती समोर सादर करुन त्यावर निर्णय घेण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते.

**स. शेर अली** रमजान ईद ही मोठया प्रमाणात साजरी करण्यात येते ईदगाह कडे जाणा-या रस्त्यावर डांबर न टाकता केवळ चुरी टाकण्यात आली, शहरातील सर्व मुस्लीम बांधव ईदगाहला येत असतात, रस्त्याचे खडडयात डांबर न टाकता केवळ चुरी टाकली त्यामुळे मी प्रशासनाचा निषेध करतो.

**कार्यकारी अभियंता (सांबावि)** पावसाळा असल्यामुळे डांबर टाकुन रस्त्याचे पॅचवर्क केलेले नाही. पावसाळा संपल्यानंतर पॅचवर्क करण्यात येईल.

**स. शेर अली** शहरात इतर ठिकाणी डांबर केले जाते. सणाच्या वेळी पावसाचे कारण सांगणे चुक आहे.

**फारुख अली खान** प्रशासन काम करुन टाकण्यात येईल असेच सांगण्यात येते. परंतू काम काही करण्यात येत नाही. हे किती दिवस असे चालणार आहे हे सांगावे. आम्ही ऐकून कंटाळा आला आहे. आपण किती दिवस आश्वासन ऐकत राहणार. सर्वसाधारण सभेत व स्थायी समितीच्या सभेत आम्ही विषय मांडतो परंतू काम काही होत नाही. आम्हाला उत्तर मिळत नाही. रिलायन्सचा विषय आहे त्यांनी रस्ते चांगले होते ते फोडून टाकले आहेत.

**सभापती** रमजान ईद निमित्त खुदवाईनगर इदगाहकडे जाणा-या रस्त्यावर पडलेले खड्डे हे डांबरीने पॅचवर्क न करता फक्त चुरी टाकण्यात आली त्यामुळे प्रशासना निषेध करण्यास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं. 62** **ठराव**

रमजान ईद निमित्त खुदवाईनगर इदगाह येथे मुस्लीम बांधवांना नमाज पढण्यासाठी लाखोंच्या संख्येने भावीक जात आहे सदरच्या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले होते त्यानिमित्त प्रशासनाने सदरील खड्डे डांबरीकरणाने न बुजविता चुरीने बुजविले हे खेदाची बाब असल्यामुळे प्रशासना निषेध करण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते.

**अ. सत्तार** बकरी ईदच्या वेळी सर्व क्षेत्रिय अधिकारी यांनी सफाई अत्यंत चांगली केली आहे. त्याबाबत सर्व क्षेत्रिय अधिकारी यांचे मि अभिनंदन करतो.

**ठराव क्रं. 63** **ठराव**

बकरी ईद निमित्त स्वच्छता विभागा मार्फत शहरात घंटा गाडया, टेम्पो-407, रिक्षा मार्फत रस्त्यावरील घाण व घरातील निघाणारे घाण तात्काळ उचलल्यामुळे दुर्गंधीची वेळ आलेली नाही तसेच तिन दिवस क्षेत्रीय अधिकारी, स्वच्छता निरीक्षक व त्यांचे सहाय्यक हे वाहनांच्या चकरा करीत असल्यामुळे चकाचक साफसफाई केल्यामुळे स्वच्छता विभागाचे सहाय्यक आयुक्त, सर्व क्षेत्रीय अधिकारीख सर्व स्वच्छता निरीक्षक यांचे अभिनंदन करण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते.

**भानुसिंग रावत** गेल्या मिटींग मध्ये गणेश टॉकीज रस्त्याचे काम करण्यासाठी सांगीतले होते आणि संचिका मागविण्यात आली होती परंतू संचिका आतापर्यत आली नाही. कार्यकारी अभियंता यांना रस्त्यावरील खडडे बुजविण्यासाठी सांगण्यात आले होते परंतू आतापर्यत त्यांनी खडडे बुजविले नाही.

**अब्दुल सत्तार** सदस्य काम सांगतात तर काम करीत नाही बाहेरच्या संघटनेचे लोक आले की त्यांचे कामे होत आहेत. आम्ही नगरसेवक आहोत आमचे कामे करणे गरजेचे आहे.

**स. शेर अली** आपल्या मनपात शहर अभियंता यांनी केलेल्या कामाची तपासणी ही एक कंत्राटी अभियंता करीत आहे. हे कितपत योग्य आहे हे सांगावे.

**सभापती** या पुढे कंत्राटी अभियंत्या मार्फत कामाची फेर तपासणी करण्यात येवू नये.

**भानुसिंग रावत** आयजी ऑफीस ते ओम गार्डनच्या रस्त्यावर मोठयाप्रमाणात खडडे आहेत ते का बुजविण्यात येत नाही. फ्रेमकव्हर तुटलेले आहे त्यावर निर्णय त्वरीत घेणे आवश्यक आहे तसे होताना दिसत नाही. त्याचा फोटो काढा असे सांगण्यात येते अपघात झाला तर त्याला कोण जबाबदार आहे.

| | |
|---|---|
| अब्दुल सत्तार | यापुढे गणपतीचा सण येत आहे त्यामुळे शहरातील प्रमुख रस्त्यावरील खडडे बुजविण्यात यावे. लाईन टाकण्यासाठी सभागृहाची मान्यता लागते त्यासाठी संबधीत अधिकारी यांच्यावर कार्यवाही प्रस्तावित करण्यात यावी. कायदयाच्या तरतूदीनुसार परवानगी देण्याचे अधिकार हे सभागृहास आहेत. कामास स्टे देवून चालणार नाही. तर त्याची चौकशी करण्यात यावी. |
| आनंद चव्हाण | चौकशी समिती गठीत करण्यात यावी. तसेच आपला रेव्हेनिव्हमध्ये वाढ करण्यासाठी प्रयत्न करावे. |
| भानुसिंग रावत | पाण्याचे बिल फाडल्यानंतर त्याची पोस्टींग होत नाही त्यामुळे इंदोरच्या कंपनीचे काम आहे त्यांनी पोस्टींग करावी ते या ठिकाणी नाहीत काम कसे होणार हे सांगावे.लोक बिल घेवून येत आहेत. त्यांची थकबाकी कमी झाली पाहीजे. |
| उप आयुक्त (प्रशासन) | आतापर्यत आपले बिले पुर्णपणे वाटप झालेले नाहीत पुढील आठवडयात पुर्ण बिलाचे वाटप होईल. काही लोकांच्या पोस्टींग झालेल्या नसल्याने त्यांना जास्तीचे बिल जास्त असतील.ज्या लोकांकडे बिल आहे त्यांना दुरुस्ती करुन देणार आहोत. यावर्षी पाण्याचे बिल अदयावत करण्यात येत आहेत. ज्या नागरीकांच्या काही त्रुटी असतील ते सुध्दा दुरुस्त करण्यात येत आहे. |
| भानुसिंग रावत | तीन लक्ष रुपये त्यांना आपण महीना देता त्यासाठी त्यांचे कंत्राट तात्काळ रदद करावे. |
| उप आयुक्त(विकास) | इंदोरच्या कंपनीसोबत आपला करार झाला असुन त्यांनी स्वाप्टवेअर देणे व त्याचे मेटन्स करणेचे त्या कंपनीचे काम आहे. बिल वसुल झाल्यानंतर त्याची पोस्टींग करण्याचे काम वसुली लिपीकाचे आहे. ते त्यांचे कडून यानंतर करुन घेण्यात येईल. |
| सभापती | इंदोर कंपनीच्या संदर्भातील सर्व संचिका ही सिस्टम मॅनेजर यांनी श्री रावत यांना दाखवावी. |
| आंनद चव्हाण | इमारतीचा सर्वे करणा-या लोंकाच्या तक्रारी येत आहेत त्या कर्मचा-यावर काय कार्यवाही केली आहे हे सांगावे. |
| उप आयुक्त (विकास) | सदस्यांनी ज्या वेळी तक्रार केली होती त्यावर कंपनीच्या लोकांची मिटींग घेवून त्यांना ताकीद देण्यात आली. लेखी सुचना नाहीत तोंडी तक्रारी होत्या त्या नुसार संबधीतास सुचना दिलेल्या आहेत. तसेच यानंतर त्यांच्यावर फौजदारी कार्यवाही करण्यात येईल असेही सांगण्यात आले. |

विषय क्रं.01

**विषय :- नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका श्री शांताराम सगणे जलतरणीका येथील डेक टाईल्स व जलतरणीकेतील टाईल्स नव्याने बसविणे बाबत. रुपये 76,67,200/-**

**संदर्भ** :- प्रशासकिय व आर्थीक मान्यता जा.क्रं. नावाशमनपा/साबांवि/19376/18 दिनांक 31.03.2018

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, श्री शांताराम सगणे जलतरणीका येथील डेक टाईल्स व जलतरणीकेतील टाईल्स नव्याने बसविणेसाठी संदर्भीय आदेशान्वये प्रशासकिय व आर्थीक मान्यता दिल्यानुसार रुपये 76,67,200/- करिता तिस-यांदा ई-निविदा सुचना जा.क्रं. नावाशमनपा/साबांवि/4498/2018 दिनांक 29.06.2018 अन्वये दैनिक सामना (राज्यस्तरीय)/दैनिक दिव्यमराठी (राज्यस्तरीय)/ दैनिक गोदातीर या वृत्तपत्रात दिनांक 02.07.2018 अन्वये ई-टेंडरींग सेलव्दारे सदर कामासाठी निविदा प्रसिध्द केल्यानुसार फक्त (01) निविदा प्राप्त झाली प्राप्त निविदा त्रिसदस्यीय समितीसमोर दिनांक 01.08.2018 रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदारांचे नांव | कंत्राटदाराने दिलेले दर |
|---|---|---|
| 01 | मे. स्वान इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड | अंदाजपत्रकीय दर |

**निविदाच्या तुलनात्मक तक्त्यानुसार मे. स्वान इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड यांची निविदा अंदाजपत्रकीय दराची असल्याने मे. स्वान इन्फ्रास्ट्रक्चर नांदेठ यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा मंजुरीस्तव मनपा स्थायी समिती समोर सादर.**

| | |
|---|---|
| सभापती | प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. |

ठराव क्रं. 64 ठराव

**विषय :- नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका श्री शांताराम सगणे जलतरणीका येथील डेक टाईल्स व जलतरणीकेतील टाईल्स नव्याने बसविणे बाबत. रुपये 76,67,200/-**

**संदर्भ** :- प्रशासकिय व आर्थीक मान्यता जा.क्रं. नावाशमनपा/साबांवि/19376/18 दिनांक 31.03.2018

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, श्री शांताराम सगणे जलतरणीका येथील डेक टाईल्स व जलतरणीकेतील टाईल्स नव्याने बसविणेसाठी संदर्भीय आदेशान्वये प्रशासकिय व आर्थीक मान्यता दिल्यानुसार रुपये 76,67,200/- करिता तिस-यांदा ई-निविदा सुचना जा.क्रं. नावाशमनपा/साबांवि/4498/2018 दिनांक 29.06.2018 अन्वये दैनिक सामना (राज्यस्तरीय)/दैनिक दिव्यमराठी (राज्यस्तरीय)/ दैनिक गोदातीर या वृत्तपत्रात दिनांक 02.07.2018 अन्वये ई-टेंडरींग सेलव्दारे सदर कामासाठी निविदा प्रसिध्द केल्यानुसार फक्त (01) निविदा प्राप्त झाली प्राप्त निविदा त्रिसदस्यीय समितीसमोर दिनांक 01.08.2018 रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदारांचे नांव | कंत्राटदाराने दिलेले दर |
|---|---|---|
| 01 | मे. स्वान इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड | अंदाजपत्रकीय दर |

**निविदाच्या तुलनात्मक तक्त्यानुसार मे. स्वान इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड यांची निविदा अंदाजपत्रकीय दराची असल्याने मे. स्वान इन्फ्रास्ट्रक्चर नांदेठ यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मंजुर करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.**

**विषय क्रं.02**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड हद्यीत **गोवर्धन घाट येथील बिएसयुपी योजने अंतर्गत बांधण्यात आलेल्या घरकुल लाभार्थ्यांना विज जोडणीसाठी ट्रॉन्सफार्मर व पथदिवा व्यवस्था करणे** या कामासाठी ई-निविदा दै. लोकमत (विभागीय पातळी) व दैनिक एकमत या वृत्तपत्रामध्ये दिनांक 27.07.2018 रोजी प्रसिध्द करुन ONLINE बी-1 निविदा मागविण्यात आले असता दिलेल्या मुदतीत एकूण 03 निविदा प्राप्त झाले आहेत व प्राप्त निविदा मनपाकेच्या निविदा समितीसमोर उघडण्यात आले असून प्राप्त दरांचे तुलनणात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | सादर केलेले दर | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| 01 | मे. सोनु इलेकट्रीकल्स नागपूर | अंदाजपत्रक दरापेक्षा 3% जास्त | 53,75,708/- |
| 02 | मे. एशियन इले. कॉप. नांदेड | अंदाजपत्रक दरा बरोबर | 52,16,134/- |
| 03 | मे. रचना इलेक्ट्रीकल्स परभणी | अंदाजपत्रक दरापेक्षा 0.99% कमी | 51,67,465/- |

वरील प्रमाणे प्राप्त दरांच्या तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा मे. रचना इलेक्ट्रीकल्स परभणी यांची असुन जी अंदाजपत्रक दरापेक्षा 0.99% कमी दराची असल्याने निविदेतील अटी व शर्तीनुसार या कामासाठी **मे. रचना इलेक्ट्रीकल्स परभणी यांची अंदाजपत्रक दरापेक्षा 0.99% कमी दराची रुपये 51,67,465/- ची निविदा मंजुर करण्यात येते** व निविदा मंजुरीनुसार लागणा-या खर्चास प्रशासकिय व आर्थीक मंजुरी प्रदान करण्यासाठी मनपा स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 65** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड हद्यीत **गोवर्धन घाट येथील बिएसयुपी योजने अंतर्गत बांधण्यात आलेल्या घरकुल लाभार्थ्यांना विज जोडणीसाठी ट्रॉन्सफार्मर व पथदिवा व्यवस्था करणे** या कामासाठी ई-निविदा दै. लोकमत (विभागीय पातळी) व दैनिक एकमत या वृत्तपत्रामध्ये दिनांक 27.07.2018 रोजी प्रसिध्द करुन ONLINE बी-1 निविदा मागविण्यात आले असता दिलेल्या मुदतीत एकूण 03 निविदा प्राप्त झाले आहेत व प्राप्त निविदा मनपाकेच्या निविदा समितीसमोर उघडण्यात आले असून प्राप्त दरांचे तुलनणात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | सादर केलेले दर | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| 01 | मे. सोनु इलेकट्रीकल्स नागपूर | अंदाजपत्रक दरापेक्षा 3% जास्त | 53,75,708/- |
| 02 | मे. एशियन इले. कॉप. नांदेड | अंदाजपत्रक दरा बरोबर | 52,16,134/- |
| 03 | मे. रचना इलेक्ट्रीकल्स परभणी | अंदाजपत्रक दरापेक्षा 0.99% कमी | 51,67,465/- |

वरील प्रमाणे प्राप्त दरांच्या तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा मे. रचना इलेक्ट्रीकल्स परभणी यांची असुन जी अंदाजपत्रक दरापेक्षा 0.99% कमी दराची असल्याने निविदेतील अटी व शर्तीनुसार या कामासाठी **मे. रचना इलेक्ट्रीकल्स परभणी यांची अंदाजपत्रक दरापेक्षा 0.99% कमी दराची रुपये 51,67,465/- ची निविदा मंजुर करण्यात येते** व निविदा मंजुरीनुसार लागणा-या खर्चास प्रशासकिय व आर्थीक मंजुरी हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.03**

**विषय :-** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत घनकचरा व्यवस्थापन प्रक्रिया प्रकल्प उभारणे कामा बाबत रुपये 21,54,95,000/-

**संदर्भ :-** 1) महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय क्रं. स्वमअ-2018/प्र.क्र.176/नवि-34 मंत्रालय मुंबई-32 दिनांक 12 एप्रिल 2018 अन्वये प्राप्त प्रशासकिय मान्यता

2) ई-निविदा सुचना जरा.क्रं. नावाशमनपा/साबांवि/6065/18 दिनांक 31.07.2018

3) मनपा स्थायी समितीस सादर केलेला प्रस्ताव जा.क्रं. नावाशमनपा/साबांवि/7285/2018 दिनांक 24.08.2018

4) मा. सभापती स्थायी समिती मनपा नांदेड यांचे पत्र्र दि. 29.08.2018

Supply, Erection & Commissioning of Municipal Waste Proceesing Plant along with Civil Works at NWCMC Nanded करणेसाठी संदर्भीय शासन निर्णयान्वये प्रशासकिय मान्यता दिल्यानुसार रुपये 21,54,95,000/- करिता ई-निविदा

सुचना जा.क्रं. नावाशमनपा/साप्रवि/4464/2018 दिनांक 28.06.2018 अन्वये निविदा मागविली असता नियोजीत वेळेत फक्त 02 निविदा विक्री झाल्या. स्पर्धा झाली नसल्याने सदर कामासाठी दुस-यांदा ई-निविदा सुचना जा.क्रं. नावाशमनपा/साबांवि/6065/2018 दिनांक 31.07.2018 अन्वये दैनिक हिन्दुस्थान टाईम्स / दैनिक सामना / दैनिक दिव्यमराठी / दैनिक लोकपत्र या वृत्तपत्रात दिनांक 01.08.2018 अन्वये ई टेंडरींग सेलव्दारे ई-निविदा प्रसिध्द केल्यानुसार एकूण 03 निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदा उघडण्यात आल्यानुसार संदर्भ क्रं. 03 अन्वये प्रस्ताव सादर करण्यता आला होता.

संदर्भ क्रं. 04 नुसार संपूर्ण कामाचे सर्वात कमी निविदा दर धारक तसेच BOQ मधील नमुद बाबीनुसार कमी निविदा दर धारक यांचेशी वाटाघाटी केल्यानंतर खालील प्रमाणे L1, L2, L3 ठरतात.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | Tipping Charges for Operation and Maintance for two years (अ) | BOQ नुसार निविदा रक्कम (ब) | दर BOQ नुसार (Tipping Charges कमी करुन) | एकूण Tipping Charges सह मागणी रक्कम (अ + ब) | |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | गुरु रामदास कन्सट्रक्शन अन्ड प्रिमारिओ वेटस मॅनेजमेंट सर्व्हीसेस प्रा. लि. | 41500000/- | 191338806.22 | 11.20% कमी | 232838806.22 | L1 |
| 02 | अल्फा थर्म लिमिटेड नवि दिल्ली | 41500000/- | 192332348.40 | 10.74% कमी | 233832348.40 | L2 |
| 03 | बी.व्ही.जी. इंडिया लि. मुंबई | 56700000/- | 198020334.32 | 08.10% कमी | 254720334.32 | L3 |

वरील सर्व बाबीचा विचार करता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील नियम 73 (क) नुसार निविदा मंजुरीच्या निर्णयास्तव सादर.

**सभापती** प्रशासनाने सादर केलेल्या निविदा मंजुरीचा तुलनात्मक तक्त्यानुसार L1 गुरु रामदास कन्सट्रक्शन अन्ड प्रिमारिओ वेटस मॅनेजमेंळ सर्व्हीसेस प्रा.लि. यांची 11.20% कमी दराची निविदा असल्यामुळे संबंधीतांची निविदा मंजुर करण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो..

**ठराव क्रं. 66** **ठराव**

**विषय :-** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत घनकचरा व्यवस्थापन प्रक्रिया प्रकल्प उभारणे कामा बाबत रुपये 21,54,95,000/-

**संदर्भ :-** 1) महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय क्रं. स्वमअ-2018/प्र.क्र.176/नवि-34 मंत्रालय मुंबई-32 दिनांक 12 एप्रिल 2018 अन्वये प्राप्त प्रशासकिय मान्यता

2) ई-निविदा सुचना जरा.क्रं. नावाशमनपा/साबांवि/6065/18 दिनांक 31.07.2018

3) मनपा स्थायी समितीस सादर केलेला प्रस्ताव जा.क्रं. नावाशमनपा/साबांवि/7285/2018 दिनांक 24.08.2018

4) मा. सभापती स्थायी समिती मनपा नांदेड यांचे पत्र्र दि. 29.08.2018

Supply, Erection & Commissioning of Municipal Waste Proceesing Plant along with Civil Works at NWCMC Nanded करणेसाठी संदर्भीय शासन निर्णयान्वये प्रशासकिय मान्यता दिल्यानुसार रुपये 21,54,95,000/- करिता ई-निविदा सुचना जा.क्रं. नावाशमनपा/साप्रवि/4464/2018 दिनांक 28.06.2018 अन्वये निविदा मागविली असता नियोजीत वेळेत फक्त 02 निविदा विक्री झाल्या. स्पर्धा झाली नसल्याने सदर कामासाठी दुस-यांदा ई-निविदा सुचना जा.क्रं. नावाशमनपा/साबांवि/6065/2018 दिनांक 31.07.2018 अन्वये दैनिक हिन्दुस्थान टाईम्स / दैनिक सामना / दैनिक दिव्यमराठी / दैनिक लोकपत्र या वृत्तपत्रात दिनांक 01.08.2018 अन्वये ई टेंडरींग सेलव्दारे ई-निविदा प्रसिध्द केल्यानुसार एकूण 03 निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदा उघडण्यात आल्यानुसार संदर्भ क्रं. 03 अन्वये प्रस्ताव सादर करण्यता आला होता.

संदर्भ क्रं. 04 नुसार संपूर्ण कामाचे सर्वात कमी निविदा दर धारक तसेच BOQ मधील नमुद बाबीनुसार कमी निविदा दर धारक यांचेशी वाटाघाटी केल्यानंतर खालील प्रमाणे L1, L2, L3 ठरतात.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | Tipping Charges for Operation and Maintance for two years (अ) | BOQ नुसार निविदा रक्कम (ब) | दर BOQ नुसार (Tipping Charges कमी करुन) | एकूण Tipping Charges सह मागणी रक्कम (अ + ब) | |
|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | गुरु रामदास कन्सट्रक्शन अन्ड प्रिमारिओ वेटस मॅनेजमेंट सर्व्हीसेस प्रा. लि. | 41500000/- | 191338806.22 | 11.20% कमी | 232838806.22 | L1 |
| 02 | अल्फा थर्म लिमिटेड नवि दिल्ली | 41500000/- | 192332348.40 | 10.74% कमी | 233832348.40 | L2 |
| 03 | बी.व्ही.जी. इंडिया लि. मुंबई | 56700000/- | 198020334.32 | 08.10% कमी | 254720334.32 | L3 |

वरील सर्व बाबीचा विचार करता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील नियम 73 (क) नुसार तुलनात्मक तक्त्यानुसार L1 गुरु रामदास कन्सट्रक्शन अन्ड प्रिमारिओ वेटस मॅनेजमेंळ सर्व्हीसेस प्रा.लि. यांची 11.20% कमी दराची निविदा असल्यामुळे संबंधीतांची निविदा मंजुर करण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो..

**विषय क्रं.04**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील जुनी वाहने विक्री / लिलावासाठी तिन वेळा ई-दरपत्रके मागविण्यात आली होती. तिस-या वेळेस फक्त एकच दरपत्रक मे. न्यु फेमस टायर्स सेल्स & सर्व्हिसेस नांदेड रोड लातुर यांचे प्राप्त झाले असुन दिनांक 21.06.2018 रोजी वाटाघाटी अंती खालील प्रमाणे वाढीव दर प्राप्त झालेले आहेत.

| अ.क्र. | वाहन क्रमांक | प्रकार | मॉडेल | आर टी ओ चे दर | मे. न्यु फेमस टायर्स सेल्स & सर्व्हिसेस यांचे दर | वाटाघाटी अंती वाढीव दर |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | MHQ-2868 | ट्रक टँकर | 976 | 80,000/- | 80,501/- | 81,000/- |
| 02 | MH-26-7139 | फायर टेंडर | 1991 | 94,000/- | 94,052/- | 94,500/- |
| 03 | MH-26-J-3991 | बजाज एम-80 | 2002 | 1500/- | 1,551/- | 1,600/- |
| 04 | MH-26-E-2730 | मारुती 800 कार | 1999 | 15,000/- | 15,051/- | 15,100/- |
| 05 | MH-26-E-273 | मारुती 800 कार | 2000 | 15,000/- | 15,051/- | 15,100/- |
| 06 | MH-26-E-283 | मारुती 800 कार | 2000 | 15,000/- | 15,051/- | 15,100/- |
| 07 | MH-26-B-3680 | मारुती अम्बुलन्स | 1999 | 15,000/- | 15,051/- | 15,051/- |
| 08 | MH-26-B-7856 | डंपर प्लेसर | 2001 | 83,000/- | 83,152/- | 84,000/- |
| 09 | MH-26-B-4118 | जेटिंग मशीन | 1995 | 1,25,000/- | 1,25,051/- | 1,25,500/- |
| 10 | MWP-6598 | फायर टेंडर | 1987 | 1,00,000/- | 1,00,551/- | 1,01,000/- |
| 11 | MZZ-886 | जीप | 1986 | 6,000/- | 6,051/- | 6,100/- |
| 12 | MZZ-530 | जीप | 1983 | 5,00/- | 5,510/- | 5,600/- |

करिता महानगरपालिकेतील जुनी वाहने दरपत्रक धारक मे. न्यु फेमस टायर्स सेल्स & सर्व्हिसेस नांदेड लातुर यांना वरील प्रमाणे दराने विक्री करणे प्रशासकिय व आर्थीक मंजुरीसाठी प्रस्ताव मनपा स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** प्रशासनाने सादर केलेला प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 67** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील जुनी वाहने विक्री / लिलावासाठी तिन वेळा ई-दरपत्रके मागविण्यात आली होती. तिस-या वेळेस फक्त एकच दरपत्रक मे. न्यु फेमस टायर्स सेल्स & सर्व्हिसेस नांदेड रोड लातुर यांचे प्राप्त झाले असुन दिनांक 21.06.2018 रोजी वाटाघाटी अंती खालील प्रमाणे वाढीव दर प्राप्त झालेले आहेत.

| अ.क्र. | वाहन क्रमांक | प्रकार | मॉडेल | आर टी ओ चे दर | मे. न्यु फेमस टायर्स सेल्स & सर्व्हिसेस यांचे दर | वाटाघाटी अंती वाढीव दर |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | MHQ-2868 | ट्रक टँकर | 976 | 80,000/- | 80,501/- | 81,000/- |
| 02 | MH-26-7139 | फायर टेंडर | 1991 | 94,000/- | 94,052/- | 94,500/- |
| 03 | MH-26-J-3991 | बजाज एम-80 | 2002 | 1500/- | 1,551/- | 1,600/- |
| 04 | MH-26-E-2730 | मारुती 800 कार | 1999 | 15,000/- | 15,051/- | 15,100/- |
| 05 | MH-26-E-273 | मारुती 800 कार | 2000 | 15,000/- | 15,051/- | 15,100/- |
| 06 | MH-26-E-283 | मारुती 800 कार | 2000 | 15,000/- | 15,051/- | 15,100/- |
| 07 | MH-26-B-3680 | मारुती अम्बुलन्स | 1999 | 15,000/- | 15,051/- | 15,051/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 08 | MH-26-B-7856 | डंपर प्लेसर | 2001 | 83,000/- | 83,152/- | 84,000/- |
| 09 | MH-26-B-4118 | जेटिंग मशीन | 1995 | 1,25,000/- | 1,25,051/- | 1,25,500/- |
| 10 | MWP-6598 | फायर टेंडर | 1987 | 1,00,000/- | 1,00,551/- | 1,01,000/- |
| 11 | MZZ-886 | जीप | 1986 | 6,000/- | 6,051/- | 6,100/- |
| 12 | MZZ-530 | जीप | 1983 | 5,00/- | 5,510/- | 5,600/- |

करिता महानगरपालिकेतील जुनी वाहने दरपत्रक धारक मे. न्यु फेमस टायर्स सेल्स & सर्व्हिसेस नांदेड लातुर यांना वरील प्रमाणे दराने विक्री करण्याची प्रशासकिय व आर्थीक मंजुरी हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.05**

**विषय :-** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत जगत ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या आश्वरुढ पुतळा परिसराचे सुशोभिकरण करण्यासाठी आर्किटेक्ट (वास्तु विशारद) यांची नेमणुक करणे बाबत

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत जगत ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या आश्वारुढ पुतळा परिसराचे सुशोभिकरण करण्यासाठी आर्किटेक्ट (वास्तु विशारद) यांची नेमणुक करणेसाठी मनपा नोटीस बोर्डावर दरपत्रक सुचना जा.क्रं. नावाशमनपा/साबांवि/5723/2018 दिनांक 24.07.2018 रोजी दरपत्रक मागविले असता एकूण 03 दरपत्रक प्राप्त झाले प्राप्त दरपत्रक त्रिसदस्यीय समिती समोर दिनांक 04.08.2018 रोजी उघडण्यात आले असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | दरपत्रक धारकांचे नांव | कामाचे विवरण | अंदाजपत्रकीय किमंतीच्या % |
|---|---|---|---|
| 01 | शेषाई असोसिएटस नांदेड | जगत ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या अश्वारुढ पुतळा परिसराचे सुशोभिकरण करण्यासाठी अर्किटेक्ट (वास्तु विशारद) यांची नेमणुक करणे | 05% |
| 02 | रचना असोसिएटस नांदेड | जगत ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या अश्वारुढ पुतळा परिसराचे सुशोभिकरण करण्यासाठी अर्किटेक्ट (वास्तु विशारद) यांची नेमणुक करणे | 06% |
| 03 | आर. डी. क्रिऐशन नांदेड | जगत ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या अश्वारुढ पुतळा परिसराचे सुशोभिकरण करण्यासाठी अर्किटेक्ट (वास्तु विशारद) यांची नेमणुक करणे | 07% |

दराच्या तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दरा **शेषाई असोसिएटस नांदेड** यांचे असुन जे 5% जास्त आहेत. सदरचे दर जास्त वाटत असल्याने संबंधीतास दर कमी करण्यासाठी वाटाघाटी करिता पाचारण केले असता संबंधीतांनी दिनांक 18.08.2018 लेखी पत्र देवुन सदरचे दर शासन मान्य दरपत्रका प्रमाणे दराने करण्याची लेखी समंती दिल्यानुसार सदर कामासाठी **शेषाई असोसिएटस नांदेड यांचे वाटाघाटी अंती शासन निर्णया प्रमाणे 2% प्रमाणे दर मंजुरीचा प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभेसमोर सादर.**

**सभापती** प्रशासनाने सादर केलेला प्रस्तावास मान्यता देण्यता येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 68** **ठराव**

**विषय :-** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत जगत ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या आश्वरुढ पुतळा परिसराचे सुशोभिकरण करण्यासाठी आर्किटेक्ट (वास्तु विशारद) यांची नेमणुक करणे बाबत

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत जगत ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या आश्वारुढ पुतळा परिसराचे सुशोभिकरण करण्यासाठी आर्किटेक्ट (वास्तु विशारद) यांची नेमणुक करणेसाठी मनपा नोटीस बोर्डावर दरपत्रक सुचना जा.क्रं. नावाशमनपा/साबांवि/5723/2018 दिनांक 24.07.2018 रोजी दरपत्रक मागविले असता एकूण 03 दरपत्रक प्राप्त झाले प्राप्त दरपत्रक त्रिसदस्यीय समिती समोर दिनांक 04.08.2018 रोजी उघडण्यात आले असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | दरपत्रक धारकांचे नांव | कामाचे विवरण | अंदाजपत्रकीय किमंतीच्या % |
|---|---|---|---|
| 01 | शेषाई असोसिएटस नांदेड | जगत ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या अश्वारुढ पुतळा परिसराचे सुशोभिकरण करण्यासाठी अर्किटेक्ट (वास्तु विशारद) यांची नेमणुक करणे | 05% |
| 02 | रचना असोसिएटस नांदेड | जगत ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या अश्वारुढ पुतळा परिसराचे सुशोभिकरण करण्यासाठी अर्किटेक्ट (वास्तु विशारद) यांची नेमणुक करणे | 06% |
| 03 | आर. डी. क्रिऐशन नांदेड | जगत ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या अश्वारुढ पुतळा परिसराचे सुशोभिकरण करण्यासाठी अर्किटेक्ट (वास्तु विशारद) यांची नेमणुक करणे | 07% |

दराच्या तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दरा **शेषाई असोसिएटस नांदेड** यांचे असुन जे 5% जास्त आहेत. सदरचे दर जास्त वाटत असल्याने संबंधीतास दर कमी करण्यासाठी वाटाघाटी करिता पाचारण केले असता संबंधीतांनी दिनांक 18.08.2018 लेखी पत्र देवुन सदरचे दर शासन मान्य दरपत्रका प्रमाणे दराने करण्याची लेखी समंती दिल्यानुसार सदर कामासाठी **शेषाई असोसिएटस नांदेड यांचे वाटाघाटी अंती शासन निर्णया प्रमाणे 2% प्रमाणे दर मंजुरीचा प्रस्तावास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.**

**विषय क्रं.06**

**विषय :- सन 2011-12 व 2012-13 वर्षीय लेखापरिक्षण अहवाल सादर करणे बाबत**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या विविध विभागाचे सन 2011-12 व 2012-13 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणाचे काम मुख्य लेखापरिक्ष विभागामार्फत केले असता त्यांचा अंतिम अहवाल या सोबत **(वेगळया पुस्तीकातील नमुद)** सादर करण्यात येत आहे.

तरी सदरील अहवालावर पुढील उचित कार्यवाहीस्तव मा. आयुक्त नावाशमनपा नांदेड यांच्याकडे सादर करण्यासाठी निर्णयास्तव सादर.

**सभापती** मुख्यलेखा परिक्षक यांनी सादर केलेला 2011.12 व 2012-13 चे वार्षीक लेखापरिक्ष अहवाल सादर केलेले असुन त्यावर नियमानुसार आयुक्तांनी पुढील कार्यवाही करण्यास मान्यता देण्यता येते.

**ठराव क्रं. 69** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या विविध विभागाचे सन 2011-12 व 2012-13 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणाचे काम मुख्य लेखापरिक्ष विभागामार्फत केले असता त्यांचा अंतिम अहवाल या सोबत **(वेगळया पुस्तीकातील नमुद) मनपा स्थायी समिती समोर सादर करण्यता आलेले असुन त्यावर आयुक्तांनी पुढील नियमानुसार कार्यवाही करण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते.**

<u>विशेष बाब म्हणुन आयत्या वेळी घेण्यात आलेला</u>

**विषय -** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत प्रभाग क्रं. 17 मधील डॉ. साजणे यांचे दवाखाना ते कै. नरेंद्रपाल बरारा यांचे घरा पर्यंतच्या रस्ता हॉटमिक्सने तात्काळ करणे आवश्यक आहे. सदरील रस्त्यावरील खड्डयामुळे या रस्त्यावरुन ये जा करणारे रहीवाशी/वानधारक अतिशय त्रस्त झालेले आहेत.

करिता प्रभाग क्रं. 17 मधील डॉ. साजणे यांचे दवाखाना ते कै. नरेंद्रपाल बरारा यांचे घरा पर्यंतच्या रस्ता हॉटमिक्सने त्वरीत करण्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक** :- नवाब गुरमितसिंघ ब-यामसिंघ **अनुमोदक:-** मुथा कांताबाई प्रकाशचंद

सभापती स. सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी

**ठराव क्रं. 70** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत प्रभाग क्रं. 17 मधील डॉ. साजणे यांचे दवाखाना ते कै. नरेंद्रपाल बरारा यांचे घरा पर्यंतच्या रस्ता हॉटमिक्सने तात्काळ करणे आवश्यक आहे. सदरील रस्त्यावरील खड्डयामुळे या रस्त्यावरुन ये जा करणारे रहीवाशी/वानधारक अतिशय त्रस्त झालेले आहेत.

करिता प्रभाग क्रं. 17 मधील डॉ. साजणे यांचे दवाखाना ते कै. नरेंद्रपाल बरारा यांचे घरा पर्यंतच्या रस्ता हॉटमिक्सने त्वरीत करण्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**सभापती** आजच्या सभेचे कामकाज संपल्यामुळे सभा संपल्याचे जाहिर करण्यता येते.

**स्वाक्षरीत/-**
**नगरसचिव,**
नांवाशमनपा, नांदेड.

**स्वाक्षरीत/-**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
नांवाशमनपा, नांदेड.